अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतर केलेल्यांना अनुसूचित जातीचे समजण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: सीबीसी-१०९०/२१३४८/[४२०]/मावक-५,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२ दिनांक ८ नोव्हेंबर, १९९०.

वाचा :- [१] शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग क्रमांक: एससीडब्ल्यू-२२६०/दिनांक ६ जुलै, १९६०.

[२] शासन परिपत्रक, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक:सीबीसी १४६२/एम, दिनांक १ ऑक्टोबर, १९६२.

[३] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्र.सीबीसी-१०७७/५०८७३/का-५, दिनांक २१ मार्च १९७९.

[४] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक: सीबीसी-१६८४/गोप ५९२/[१११९]/ बीसीडब्ल्यू-५, दिनांक १६ ऑक्टोबर, १९८५.

[५] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक: सीबीसी-१०८४/५४५७७/[१८१३]/ बीसीडब्ल्यू-५, दिनांक १ नोव्हेंबर १९८५.

[६] शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक: सीबीसी-१०८५/२६३०४/[२११९]/ बीसीडब्ल्यू-५, दिनांक ६ ऑक्टोबर, १९८६.

[७] केंद्र शासन, कल्याण मंत्रालय, पत्र क्रमांक: १२०१६/२८/९०/ एससीडी[आर-एक], दिनांक ३१ जुलै, १९९०.

शासन निर्णय :- भारतीय घटनेच्या कलम ३४१ नुसार अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश १९५० च्या परिच्छेद ३ नुसार केवळ हिन्दू किंवा शीख धर्मियांना अनुसूचित जातीचे समजले जावू शकत होते. तथापि, अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना अनुसूचित जातीचा दर्जा मिळावा या हेतूने केंद्र शासनाने घटना [अनुसूचित जाती] आदेश [सुधारणा] कायदा १९९० दिनांक ३ जून, १९९० अन्वये घटना [अनुसूचित जाती] आदेश १९५० मध्ये सुधारणा करून अनुसूचित जातीसंबंधी घटना आदेश बौध्द धर्मियांनाही लागू करण्यात आल्याचे घोषित केले आहे. त्यानुसार अनुसूचित जातीची यादी हिन्दू शिख आणि बौध्द धर्मियांनाही आता लागू झालेली आहे. वरील परिस्थितीस अनुसरून मागासवर्गीयांना जातीचे प्रमाणपत्र देण्याबाबतचे वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशामध्ये सुधारणा करण्याची गरज निर्माण झाली.

२. वरील परिस्थितीस अनुसरून मागासवर्गीयांना जातीचे प्रमाणपत्र देण्यासंबंधी वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या आदेशात खालीलप्रमाणे बदल / सुधारणा करण्यात येत आहेत:-

१] दिनांक ६ जुलै, १९६० च्या शासन निर्णयात बदल करून शासन असे आदेश देत आहे की, अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना दिनांक ३ जून, १९९० पासून राज्य तथा केंद्र शासनाच्या घटनात्मक तथा सर्व प्रकारच्या आरक्षण व सवलतींचा फायदा घेता येईल. तसेच ते अस्पृश्यता निवारणार्थ असलेल्या योजनेचाही लाभ मिळण्यास पात्र असतील.

२] अनुसूचित जातीमधून बौध्द धर्मात धर्मांतरीतांना प्रमाणपत्र देण्याकरिता दिनांक १ ऑक्टोबर, १९६२ च्या शासन परिपत्रकान्वये निर्धारित करण्यात आलेला नमूना रद्द करण्यात आला आहे असे समजण्यात यावे.

३] [अ] दिनांक २१ मार्च, १९७९ च्या शासन निर्णयान्वये करण्यात आलेल्या सूचनांपैकी सूचना क्र. १६-ए खालीलप्रमाणे बदलण्यात आली आहे असे समजण्यात यावे :-

(16-A) A person claiming to belong to a Backward Class should profess either Hindu or Sikha or Boudha religion.

[ब] तसेच सूचना क्र. १७ वगळण्यात आली आहे असे समजण्यात यावे.

४] बौध्द धर्मिय व्यक्तींची जात अनुसूचित जातीच्या यादीत समाविष्ट असल्यास त्यास वरील परिच्छेद २[१] यास अनुसरून अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देता येते असे असल्याने दिनांक ६ ऑक्टोबर, १९८६ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद ४ मधील दुसऱ्या ओळीत "परंतु अर्जदाराच्या कागदोपत्री" या शब्दांनंतर असलेले "नवबौध्द किंवा" हे शब्द तसेच त्याच परिच्छेदात सातव्या ओळीत "स्वत:च्या कागदपत्राच्या आधारावर" या शब्दांनंतर असलेले "दिनांक १ ऑक्टोबर १९६२ च्या शासन परिपत्रकान्वये निर्धारित करण्यात आलेल्या नमुन्यात नवबौध्द म्हणून किंवा" हे शब्द वगळण्यात यावेत.

५] दिनांक १६ ऑक्टोबर १९८५ च्या शासन निर्णयात व त्या सोबतच्या परिशिष्ट "अ" मध्ये ज्या ज्या ठिकाणी नवबौध्द अथवा नवबौध्दांसह असे शब्द असतील ते वगळण्यात आले आहेत असे समजावे.

३. ज्या व्यक्तीकडे "नवबौध्द" अथवा अनुसूचित जातीतून बौध्द धर्मात धर्मांतरीत असल्याचे प्रमाणपत्र आहे अशा व्यक्तींना व त्यांच्या पाल्यांना त्या प्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे. ज्या व्यक्तींकडे यापूर्वी "नवबौध्द" असल्याचे प्रमाणपत्र आहे त्या व्यक्ती अनुसूचित जातीच्या भविष्य काळात सवलती

मिळण्यासाठी पात्र आहेत असे समजण्यात यावे. अशा नवबौद्ध धर्मिय व्यक्तींना केंद्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

म. ह. कांबळे,
सहाय्यक सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
मुख्य महानगर दंडाधिकारी,
सर्व जिल्हा दंडाधिकारी,
सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी,
सर्व विभागीय आयुक्त,
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
संचालक, आदिवासी कल्याण, महाराष्ट्र राज्य, नाशिक,
संचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे समाजकल्याण अधिकारी,
समाजकल्याण अधिकारी, बृहन्मुंबई, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभाग,
मंत्रालयीन निरनिराळ्या विभागांखालील इतर सर्व विभागाध्यक्ष व कार्यालय प्रमुख,
संचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई,
कक्ष अधिकारी, मावक-२, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
सर्व कार्यासने, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
निवड नस्ती, मावक-५.

---